अग्निसुरक्षेसंदर्भात अस्तित्वातील अधिनियम/ नियम यामध्ये कालानुरुप उपाययोजना/ शिफारसी सादर करण्यासंदर्भात “कार्यगट” <u>निर्माण करणेबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्र. एमसीओ-२०१९/प्र.क्र.११६/नवि-१४,
मंत्रालय, मुख्य इमारत (४ था मजला),
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २० जुलै, २०१९

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्र राज्यात दरवर्षी आगीच्या मोठ्या प्रमाणात घटना घडत आहेत, यामुळे राज्यातील मानवी, वित्त, संपत्तीची मोठ्या प्रमाणात हानी होत आहे. यातील बऱ्याचश्या घटना ह्या मानवी चुका तसेच संबंधीत अधिनियमात असलेल्या विविध त्रुट्यांमुळे घडत असल्याचे, ह्या संदर्भात, या क्षेत्रातील विविध तज्ज्ञांनी केलेल्या निरीक्षणात/ अभ्यासात आढळून आलेले आहे. यासाठी “अग्निसुरक्षेसंदर्भात करावयाच्या विविध उपाययोजनातंर्गत” कांही उपाय सुचविले असून, त्याअंतर्गत अधिनियमातही कांही सुधारणा करणे आवश्यक असल्याने, अशा सुधारणा/शिफारसी सुचविण्यासाठी शासनस्तरावर एक “कार्यगट” निर्माण तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

उपरोक्त अनुषंगाने खालीलप्रमाणे एक “कार्यगट” निर्माण करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.:-

(अ) कार्यगट खालीलप्रमाणे असेल: -

(१)	संचालक, सी.एस.जी., अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई.	अध्यक्ष
(२)	सल्लागार, सेंटर फॉर सेफ्टी इंजिनिअरींग, आय.आय.टी., गांधीनगर.	सदस्य
(३)	सर्व्हेअर आणि लॉस ॲसेसॉर	सदस्य
(४)	सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई	सदस्य
(५)	मुख्य अग्निशमन अधिकारी आणि संचालक, स्टेट फायर सर्व्हीस	सदस्य

(ब) सदर “कार्यगट” पुढील ०३ महिन्यात सर्वांगीण दृष्टीने अभ्यास करुन, शासनास शिफारसींचा अहवाल सादर करील.

(क) यासाठी अध्यक्ष अथवा सदस्य यांना कोणतेही मानधन मिळणार नाही.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०८०११३२०४२९५२५ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sachin Dattatray Sahasrabuddhe

Digitally signed by Sachin Dattatray Sahasrabuddhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7db996f7c088dbf2d76ad85484362957aab596e46ec268eca3b9822aa62fd32b, serialNumber=67648ad8c40ecf8d0f911eaf72d918202f540836a5f65e8b71c0a69d61291, cn=Sachin Dattatray Sahasrabuddhe
Date: 2019.08.01 13:27:09 +05'30'

(सचिन सहस्त्रबुध्दे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति :-

१. मा.विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
२. सर्व सन्मानीय विधानसभा / विधानपरिषद व संसद सदस्य
३. मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
५. सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. मा.मुख्य सचिव यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक
७. मा.लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय
८. मुख्यमंत्री महोदय यांचे जनसंपर्क अधिकारी
९. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
१०. राज्यातील सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
११. संचालक, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई.
१२. संचालक, सेंटर फॉर सेफ्टी इंजिनिअरींग, आय.आय.टी., गांधीनगर, गुजरात.
१३. संचालक, अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई.
१४. राज्यातील सर्व नगरपरिषदा/ नगरपंचायतींचे मुख्याधिकारी
१५. निवडनस्ती (नवि-१४).